**प्रेसनोट दि. ०६/१२/२०१७**

**मोका गुन्हयातील सव्वा वर्षांपासुन फरारी आरोपीस संघटीत गुन्हेगारी विरोधी पथक, उत्तर विभाग, गुन्हे शाखा, पुणे शहर पथकाकडून शिताफीने अटक**

दिनांक ०५/१२/२०१७ रोजी संघटीत गुन्हेगारी विरोधी पथक, उत्तर प्रादेशिक विभाग, गुन्हे शाखा पुणे शहर चे पोलीस निरीक्षक ब्रम्हानंद नाईकवाडी हे त्यांचेकडील पोलीस स्टाफ सह भोसरी पोस्टे गुरनं ४९३/२०१७ भादिव कलम ३९२,३४ या गुन्हयातील रावण ऊर्फ अनिकेत जाधव याचे टोळीतील पाहिजे असलेले आरोपी अक्षय प्रभाकर साबळे वय २२ रा.शितळा देवी मंदीराजवळ आकुर्डी पुणे व इतर यांचा निगडी, देहुरोड पोस्टे पुणे ग्रामीण हददीत शोध घेत असताना, देहुरोड येथे स्टाफ मधील पो.ना अतुल मेंगे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, मुंढवा पोस्टे गुरनं २३५/२०१६, संघटित गुन्हेगारी नियत्रण अधिनियम, सन १९९९ कलम ३ (१) (ii) ३ (२) ३ (४) अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ कलम ३ व ७ मोका केस मधील पाहिजे आरोपी नामे रमेश शंकर मारकड वय ३२ वर्ष, रा.शेलारवाडी, देहुरोड ता.मावळ जि.पुणे हा सदर गुन्हयात सव्वा वर्षांपासुन फरारी असुन त्याचेकडील पैसे संपल्याने पैसे घेण्यासाठी व नातेवाईकांना भेटण्यासाठी इंद्रायणी हॉटेल देहुरोड येथे दुपारी येणार असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्याने पोनि ब्रम्हानंद नाईकवाडी यांनी सदर ठिकाणी स्टाफ सह सापळा रचुन त्यास शिताफीने ताब्यात घेवुन पुढील कारवाईसाठी मोका केस तपास अधिकारी श्री.समीर शेख सहा.पोलीस आयुक्त सो, गुन्हे -१ पुणे शहर यांचे ताब्यात दिलेले आहे.

सदरची कारवाई ही मा. अपर पोलीस आयुक्त सो. श्री प्रदीप देशपांडे, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री पंकज डहाणे सो., मा. सहा पोलीस आयुक्त, गुन्हे- १ श्री.समीर शेख, मा. सहा पोलीस आयुक्त, गुन्हे- २ श्री संजय निकम सो., यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री ब्रम्हानंद नाईकवाडी, राज देशमुख, अतुल मेंगे, किरण चोरगे, निलेश शिवतरे यांनी केली आहे.